# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- registrar@unigug.ac.in  दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./१३५४/२०२४  दि. १५ /०५/२०२४

## परिपत्रक

**विषय :- गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांनी आयोजित प्रशिक्षणाला उपस्थित राहण्याकरीता Google Form मध्ये नोंदणी करण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ कायद्यानुसारची कार्यप्रणाली, वित्तीय कामकाज, प्रशासकीय कामकाज, शैक्षणिक कामकाज, संगणकीय कामकाज इ. बाबतची बदलत्या काळानुसार अधिकची माहिती व्हावी. शासनाच्या कार्यालयीन कामकाजात पारंगत होऊन येणारी आव्हाने त्यांना अधिक चांगल्या रितीने पेलता यावीत. याकरीता माहे - मे / जून २०२४ या कालावधीत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे विद्याठातील व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामध्ये सहभागी होणाऱ्या शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी नोंदणी करण्याकरीता *गुगल फॉर्म* तयार करण्यात आलेला असून त्याची लिंक व क्यु-आर कोड खालील प्रमाणे आहे.

त्याअनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयातील कमाल दोन शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांचे नामनिर्देशन करावे व खाली दिलेल्या लिंकवर जाऊन किंवा क्यु-आर कोड स्कॅन करुन दिलेल्या नमुन्यानुसार दि. २०/०५/२०२४ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत अचूक माहिती भरुन *सबमीट* करावे. प्रशिक्षणाची तारीख निश्चित झाल्यावर कळविण्यात येईल.  ***गुगल फॉर्म लिंक - https://forms.gle/NzQptCi3wdrDpirt5***

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीकरीता अग्रेषित तसेच सदर परिपत्रक महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. कामाजी देशमुख)
उपकुलसचिव (प्र.)(आस्थापना)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली